**महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या तरतुदींनुसार शासकीय जमिनीवरील दिनांक ०१/०१/२०११ पर्यंतची निवासी अतिक्रमणे नियमित करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक:- जमीन-२०२६/प्र.क्र.२०/जमीन-१**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२**
**दिनांक:- २५ मार्च, २०२६**

**वाचा:-**

**१)** महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील कलम ४०, ५०, ५१, ५२,५३ व ६४

**२)** महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनींची विल्हेवाट करणे) नियम, १९७१ मधील नियम ४३,४३ अ व ५२

3) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र. एलईएन १०/२००१/प्र.क्र.२२५/ज-१, दि. ०४.०४.२००२

**४)** मा. सर्वोच्च न्यायालय, दिवाणी अपील क्र. ४९४/२०११ (जगपाल सिंग विरुद्ध पंजाब राज्य) मधील आदेश.

**५)** महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र. जमीन ०३/२०११/प्र.क्र.५३/ज-१, दि. १२.०७.२०११

**६)** ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१७/प्र.क्र.४८/यो-९, दि. १६.०२.२०१८.

**७)** नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र. अनधिक-२०१७/प्र.क्र.८/नवि-३०, दि. १७.११.२०१८.

**८)** ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२१/प्र.क्र.१०२/पंराज-४, दि. २२.०२.२०२२.

**९)** मा.मंत्रिमंडळाच्या दि.२४.०३.२०२६ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णय

**<u>प्रस्तावना:-</u>**

शासन निर्णय दि.०४.०४.२००२ अन्वये दि.०१.०१.१९९५ पर्यंत मुंबई व मुंबई उपनगर जिल्हा वगळून उर्वरित जिल्ह्यांमध्ये ज्या झोपडपट्टी धारकांना संरक्षण मिळाले आहे, अशा झोपडपट्टी धारकांना अतिक्रमित केलेल्या शासकीय जमिनी प्रदान करणे व ज्या तारखेला सदर झोपडपट्टी घोषित झालेली आहे,त्या तारखेचे बाजारमूल्य ही कब्जेहक्काची रक्कम म्हणून वसूल करणे व त्या रकमेवर व्याज व दंडनीय रक्कम याऐवजी बाजारमूल्याच्या किंमतीच्या इतकी रक्कम दंडनीय रक्कम व व्याज म्हणून वसूल करणेबाबत निर्णय घेण्यात आला. तसेच,या शासन निर्णयाद्वारे झोपडपट्टी वासियांव्यतिरिक्त दि.०१.०१.१९९५ पर्यंत रहिवाशी प्रयोजनासाठी झालेली अतिक्रमणे नियमानुकूल करताना ज्या दिवशी अतिक्रमण केले आहे, त्या दिवसाच्या बाजारमुल्याच्या अडीच पट इतकी रक्कम व त्यावर प्रचलित दराने व्याज आकारले जाते.

वाणिज्य प्रयोजनासाठी केलेले अतिक्रमण - जमिनीची किंमत दंडनीय रकमेऐवजी अतिक्रमणाच्या तारखेस असलेल्या बाजारकिंमतीच्या पाच पट दंडनीय रक्कम तसेच नियमित करण्याच्या तारखेपर्यंत व्याज आकारुन नियमित करण्याची तरतूद करण्यात आली.

तथापि, तद्नंतर अतिक्रमण नियमानुकूल करणेबाबत महसूल विभागाचे कोणतेही धोरण नाही.

**०२.** राज्यातील ग्रामीण व शहरी भागातील शासकीय जमिनीवर तसेच गायरान जमिनीवर मोठ्या प्रमाणावर निवासी हेतूने अतिक्रमणे झालेली आहेत. केंद्र व राज्य शासनाचे "सर्वांसाठी घरे" हे धोरण विचारात घेता, ही अतिक्रमणे विशिष्ट अटी व शर्तींच्या अधीन राहून नियमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. ग्रामविकास विभागाने दि.१६.०२.२०१८ रोजीच्या आणि नगरविकास विभागाने दि.१७.११.२०१८ रोजीच्या निर्णयान्वये, वेळोवेळी सुधारणा करून आपापल्या कार्यक्षेत्रातील अतिक्रमणे नियमित करण्याबाबत धोरण जाहीर केले आहे.

त्यानुसार, विकसित महाराष्ट्र २०४७ या धोरणाच्या ४ मुख्य उद्दिष्टांपैकी ३ रे - 'सर्व समावेशक महाराष्ट्र - प्रादेशिक असमतोल दूर करून समाजातील शेवटच्या घटकापर्यंत विकास पोहोचवणे' हे साध्य करण्यासाठी राज्यातील प्रत्येक नागरिकाला निवास व्यवस्था उपलब्ध करून देणे. तसेच शाश्वत विकास उद्दिष्टे (सस्टेनेबल डेव्हलपमेंट गोल्स) (SDG) १७ मधील उद्दिष्ट क्रमांक ११ शाश्वत शहरे आणि समुदाय यांच्या पूर्ततेसाठी तसेच संपूर्ण राज्यात एकसूत्रीपणा आणण्यासाठी मा.मंत्रिमंडळाने दि.24.03.2026 रोजी झालेल्या बैठकीत घेतलेल्या निर्णयास अनुसरुन महसूल विभागाच्या अखत्यारीत असलेल्या शासकीय जमिनीवरील दिनांक ०१.०१.२०११ पर्यंतची निवासी अतिक्रमणे नियमित करण्याबाबत यापूर्वीचे विभागाचे सर्व शासन निर्णय अधिक्रमित करण्यात येऊन सुधारित व एकत्रित शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

**<u>शासन निर्णय:-</u>**

राज्यातील गरीब व गरजू कुटुंबांच्या निवासस्थानाचा प्रश्न निकाली काढण्यासाठी, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ कलम ४० कलम ५१ आणि कलम ६४ मधील अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनींची विल्हेवाट करणे) नियम, १९७१ मधील नियम ४३, ४३(अ) व ५२ मधील तरतुदीनुसार विशिष्ट अटींवर राज्यातील बृन्हमुंबई वगळून इतर जिल्ह्यामधील दिनांक ०१.०१.२०११ रोजी किंवा त्यापूर्वी झालेली व सध्या अस्तित्वात असलेली केवळ निवासी प्रयोजनासाठी झालेली अतिक्रमणे नियमित करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

**०२.** शासनाच्या या निर्णयाच्या अनुषंगाने मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हे वगळून राज्यातील इतर जिल्ह्यांमध्ये शासकीय जमिनींवरील निवासी प्रयोजनासाठी झालेली अतिक्रमणे नियमित करण्यासाठी खालीलप्रमाणे सुधारित मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येत आहेत:-

**२.१) अतिक्रमणे नियमित करण्यासाठीची पात्रता:-**

**२.१.१)** दिनांक ०१.०१.२०११ रोजी किंवा त्यापूर्वी झालेली व सध्या अस्तित्वात असलेली केवळ निवासी प्रयोजनासाठी झालेली अतिक्रमणेच नियमित करण्यास पात्र राहतील. मात्र,त्याच वस्तीतील/परिसरातील नागरिकांच्या तातडीच्या महत्वाच्या दैनंदिन गरजांसाठीचे अतिक्रमण जसे- किराणा दुकान, मेडीकल, दळणाची चक्की, छोटेखानी दवाखाना, इ. अतिक्रमण अतिक्रमणधारकांचे घरासह स्वतःचे असल्यास घराचाच भाग समजून अपवादात्मक परिस्थितीत नियमानुकूल करावे.

**२.१.२)** दिनांक ०१.०१.२०११ रोजी अतिक्रमण असल्याच्या पुराव्यासाठी मतदार यादीतील नाव (त्या त्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीकरिता वार्ड/प्रभाग निहाय तयार केलेल्या मतदार याद्या), वीज बिल, मालमत्ता कराची पावती किंवा निवासी पुराव्यासाठीचे इतर शासकीय दस्तऐवज (शिधापत्रिका वगळून) जसे ग्रामपंचायत मधील आठ अ उतारा,अतिक्रमण सर्वेक्षण नोंदवही, झोपडपट्टी घोषणेची अधिसूचना, वगैरे ग्राह्य धरले जातील. उपग्रह छायाचित्र हा सुद्धा एक महत्वाचा पुरावा म्हणून ग्राह्य धरण्यात येईल.

तसेच, चालू पुरावा म्हणून मागील एक वर्षातील उपरोक्त पुराव्यांपैकी रहिवासाचा शासकीय पुरावा देणेसुद्धा अनिवार्य असेल.

**२.१.३)** सदर अतिक्रमण हे केवळ स्व-राहण्यासाठी (निवासी हेतूने) केलेले असावे. व्यावसायिक वापरासाठीची अतिक्रमणे या योजनेत नियमित करण्यासाठी पात्र ठरणार नाहीत.

**२.१.४)** उक्तप्रमाणे निवासी अतिक्रमणे ही केवळ ज्या ठिकाणी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या तरतुदीनुसार मंजूर प्रादेशिक योजना व विकास योजनेनुसार तसेच, एकात्मिक विकास नियंत्रण नियमावली (UDCPR), स्थानिक नियोजन प्राधिकरण ( एमएमआरडीए, पीएमआरडीए, सिडको, नैंना/ नागरी प्राधिकरण इत्यादी) मधील नियोजनात निवासी प्रयोजनासाठी वापर अनुज्ञेय आहे,अशा जमिनीवरील अतिक्रमण नियमानुकूल करण्यात येतील.

**२.१.५)** गायरान जमिनीवरील अतिक्रमणाच्या अनुषंगाने'जगपाल सिंग आणि इतर विरुद्ध पंजाब राज्य आणि इतर (AIR २०११ सुप्रीम कोर्ट ११२)' या प्रकरणात मा. सर्वोच्च न्यायालयाने दि. २८.०१.२०११ रोजी दिलेले निर्देश विचारात घेऊन या धोरणांतर्गत आता दि. ०१.०१.२०११ पर्यंत गायरान जमिनीवरील भूमिहीन शेतमजूर, अनूसूचित जाती तसेच अनुसूचित जमातीच्या व्यक्तींनी निवासी प्रयोजनासाठी केलेली अतिक्रमणे नियमानुकूल न करता सदर अतिक्रमण धारकांना प्रधानमंत्री आवास योजनेअतंर्गत (सार्वजनिक प्रयोजनार्थ) निवास उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने सदर जमीन ही वैयक्तिक लाभार्थ्यांना प्रदान न करता ती संबंधित स्थानिक नियोजन प्राधिकरण / स्थानिक स्वराज्य संस्था यांना उपलब्ध करुन देण्यात येईल.

**२.१.६)** झुडपी जंगल जमीनी बाबत मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांनी रिट याचिका क्रमांक २०२/१९९५ मधील L.A. क्रमांक १२४६५/२०१९ मध्ये दि. २२ मे २०२५ मधील निर्देशानुसार अतिक्रमणे नियमानुकूल करताना सदरचे क्षेत्र डिनोटीफाय करणेसाठी केंद्रीय सशक्तता समिती मार्फत प्रस्ताव केंद्र शासनास सादर करणे याबाबतच्या निर्देशांचे पालन करण्यात यावे. तथापि,अशा प्रकरणी यासंदर्भातील सूचनांचे पालन करावे.

**२.१.७)** या शासन निर्णयान्वये अतिक्रमण नियमानुकूल करताना कोणत्याही परिस्थितीत भारताचा नागरिक नसलेल्या व्यक्तीचे अतिक्रमण नियमानुकूल होणार नाही याबाबत अत्यंत काळजीपूर्वक दक्षता घेण्याचे निर्देश देण्यात येत आहेत. असे अतिक्रमण आढळल्यास ते तात्काळ काढण्यात यावे व या परदेशी कुटुंबाबाबत संबंधित पोलीस स्टेशनला तात्काळ कळवावे.

**२.१.८)** नागरी भागातील महानगरपालिका, नगर परिषद, व नगरपंचायत,ग्रामीण भागातील जिल्हापरिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत तसेच स्थानिक नियोजन प्राधिकरण यांच्या मालकीच्या जमिनीवरील निवासी प्रयोजनासाठी झालेली अतिक्रमणे या धोरणानुसार नियमानुकूल करण्यासाठी या शासन निर्णयाद्वारे क्षेत्रनिहाय गठित समित्या सक्षम असून त्यासाठी वेगळ्याने शासनाच्या मान्यतेची आवश्यकता नाही. तथापि, अशी अतिक्रमणे नियमित करण्यासाठी त्या त्या विभागामार्फत जर काही नियम अथवा मार्गदर्शक सूचना विहित करण्यात आल्या असतील तर अशा नियमांचे/ सूचनांचे पालन करणे संबंधित यंत्रणेवर बंधनकारक राहील. संबंधित यंत्रणांनी असे अतिक्रमण नियमानुकूल करण्याचे प्रस्ताव संबंधित समितीसमोर सादर करावेत.

**२.२) अटी व शर्ती :-**

या योजनेअंतर्गत अतिक्रमण नियमित करण्यासाठी खालील अटींचे पालन करणे अनिवार्य राहील:-

**अ) एका कुटुंबासाठी एकच लाभ:-** 'कुटुंब' या व्याख्येत पती, पत्नी (अतिक्रमित जागेवरील घरात एकापेक्षा अधिक पती-पत्नी एकत्र राहात असू शकतात) आणि त्यांच्यावर अवलंबून असलेली अविवाहित मुले-मुली यांचा समावेश असेल. एका कुटुंबाला संपूर्ण महाराष्ट्र राज्यात केवळ एकच अतिक्रमण नियमित करून घेता येईल. तसे शपथपत्र (Affidavit) अर्जासोबत जोडणे बंधनकारक असेल.

**ब) हस्तांतरणास बंदी :-** अतिक्रमण नियमानुकूल केलेले क्षेत्र हे नवीन शर्तीवर म्हणजे हस्तांतरण न करण्याच्या अधीन राहणार असल्याने अतिक्रमण धारक असे क्षेत्र भोगवटादार वर्ग-२ म्हणून धारण करेल. अतिक्रमण नियमानुकूल केलेल्या आदेशाच्या तारखेपासून पुढील ५ वर्षांपर्यंत सदर जागा कोणत्याही प्रकारे विक्री, भाड्याने देणे किंवा इतर प्रकारे हस्तांतरित करता येणार नाही किंवा वापरत बदल करता येणार नाही. या अटीचा भंग केल्यास अतिक्रमण नियमानुकूल करुन जागा प्रदानाचा आदेश रद्द करून ती जागा शासनजमा करण्यात येईल. जिल्हाधिकारी यांनी अधिकार अभिलेखात (गाव नमुना नंबर ७/१२ किंवा मालमत्ता पत्रक) चे इतर हक्कात ''नवीन शर्त' असा शेरा घेण्याची दक्षता घ्यावी.

**क) बांधकामाचे स्वरूप:-** केवळ 'निवासी' वापरासाठीचे बांधकाम ग्राह्य धरले जाईल. जर त्या जागेचा काही भाग व्यावसायिक (उदा. दुकान, गॅरेज) कामासाठी वापरला जात असेल, तर असे अतिक्रमण नियमानुकूल करावयाचे असेल तर सदर अतिक्रमित क्षेत्राच्या जमिनीच्या प्रचलित वार्षिक दर विवरणपत्रानुसार येणारे बाजारमूल्यानुसार येणाऱ्या किंमतीच्या २५ टक्केएवढी रक्कम कब्जेहक्काची रक्कम म्हणून आकारण्यात यावी.

**ड) तांत्रिक निकष आणि ना-हरकत प्रमाणपत्र:-** जर अतिक्रमण केलेली जागा सार्वजनिक प्राधिकरणाच्या (उदा. रेल्वे, महामार्ग, विद्युत वाहिन्या) जवळ असल्यास, तसेच नदी/ नाले, वन, सी.आर.झेड., एन.डी.झेड. बाबत संबंधित विभागाचे/प्राधिकरणाचे ना-हरकत प्रमाणपत्र (NOC) आवश्यक असेल.

**२.३) जागेची मर्यादा आणि शुल्क :-**

**ग्रामीण तसेच शहरी भागात १५०० चौ. फूटापर्यंतचे क्षेत्र नियमित करता येईल.**

१) ५०० चौ. फूट क्षेत्रापर्यंत सर्व निवासी अतिक्रमणे विनामूल्य नियमानुकूल करण्यात यावीत.

२) ५०० चौ.फूट क्षेत्रापेक्षा अधिक परंतु १५०० चौ.फूट क्षेत्रापेक्षा अधिक नसलेली अतिक्रमणे नियमानुकुल करताना पहिल्या ५०० चौ. फूट क्षेत्रापर्यंत सर्व निवासी अतिक्रमणे विनामूल्य नियमानुकूल करण्यात यावीत.

३) ५०० चौ. फुटापुढील क्षेत्रासाठी प्रचलित वार्षिक दर विवरणपत्रानुसार येणारे बाजारमूल्यानुसार येणाऱ्या किंमतीच्या १० टक्के रक्कम तर निवासी जागेचा काही भाग व्यावसायिक असल्यास प्रचलित बाजारमुल्याच्या २५ टक्के रक्कम आकारली जाईल.

४) ज्या अतिक्रमणधारकाने या योजनेचा लाभ घेण्याच्या दृष्टीने अतिक्रमण नियमानुकूल करण्यासाठी इच्छा व्यक्त केली आहे; परंतु, अशा अतिक्रमणधारकाचे अतिक्रमित क्षेत्र १५०० चौ.फू. क्षेत्रापेक्षा जास्त आहे; अशा अतिक्रमणधारकाचे १५०० चौ.फू. क्षेत्रापेक्षा जास्त असलेले अतिक्रमण नियमानुकूल करण्यात येऊ नये.सदर अतिक्रमण काढून टाकण्यात यावे. असे अतिक्रमण निष्कासित केल्यानंतर त्या ठिकाणी पुन्हा अतिक्रमण होणार नाही याची दक्षता संबंधित यंत्रणेने घ्यावी. या निष्कासित केलेल्या जागेवर मूळ अतिक्रमण धारकाने पुन्हा अतिक्रमण

केल्यास तो शर्तभंग समजून मूळ अतिक्रमण नियमित केलेल्या जागेवरील अतिक्रमण देखील निष्कासित करण्यात यावे.

**२.४.) अंमलबजावणीची कार्यपद्धती:-**

**१. अर्जासाठी मुदत:** - या शासन निर्णयाद्वारे विहित केलेल्या अटी व शर्तीची पूर्तता होत असलेल्या व्यक्ती (संस्था नव्हे) अतिक्रमण नियमानुकूल करण्यास पात्र असतील अशा व्यक्तींना अतिक्रमण नियमानुकूल करण्यासाठीचा अर्ज दाखल करण्याकरीता दिनांक ३१ डिसेंबर, २०२६ पर्यंत मुदत असेल. या दिनांकापर्यंत अर्ज प्राप्त झालेल्या पात्र व्यक्तींना त्यांचे अतिक्रमण नियमित होईपर्यंत संरक्षण प्राप्त असेल. तथापि, या दिनांकापर्यंत अर्ज न करणाऱ्या व्यक्ती तसेच इतर अपात्र व्यक्ती / संस्था यांची अतिक्रमणे,त्यानंतर कोणत्याही दिनांकास निष्कासित करण्यासाठी पात्र राहतील. सक्षम प्राधिकारी यांनी अशी अतिक्रमणे धडक कार्यक्रम घेऊन व कालमर्यादा निश्चित करुन निष्कासित करावीत. तथापि, अशा सर्व प्रकरणी मा. न्यायालयाचे काही आदेश असल्यास त्यानुसारच कार्यवाही करावी.

**२. अर्ज व पुराव्यांची स्वीकृती व पडताळणी: -**

महानगरपालिका व “अ” वर्ग नगरपालिका क्षेत्रात महानगरपालिकांचे संबंधित वार्ड अधिकारी यांनी अतिक्रमण नियमानुकूल करण्याबाबतचे अर्ज स्वीकृत करावेत. त्यांनी प्राप्त अर्ज व पुराव्यांची छाननी करून पत्र/अपात्रतेबाबतच्या अभिप्रायासह आयुक्त, महानगरपालिका यांचेकडे अग्रेषित करावेत. आयुक्त, महानगरपालिका यांनी सदरचे अर्ज पत्र/अपात्रतेबाबत पुन्हा पडताळणी करून अंतिम निर्णयासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीकडे पाठवावीत.

इतर “ब” व “क” वर्ग नगरपालिका/नगरपरिषद/नगरपंचायत क्षेत्रात संबंधित मुख्याधिकारी यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील अतिक्रमण नियमानुकूल करण्याबाबतचे अर्ज स्वीकृत करावेत. त्यांनी प्राप्त अर्ज व पुराव्यांची छाननी करून पत्र/अपात्रतेबाबतच्या अभिप्रायासह उप विभागीय अधिकारी यांच्या समितीकडे अग्रेषित करावेत.

ग्रामीण क्षेत्राकरिता संबंधित ग्रामसेवक यांनी अतिक्रमण नियमानुकूल करावयाचे अर्ज स्वीकृत करावेत व ते संबंधित तहसीलदार यांना अग्रेषित करावेत. तहसीलदार यांनी ग्रामपंचायतनिहाय प्राप्त अर्ज व पुराव्यांची छाननी करून पत्र/अपात्रतेबाबत त्यांच्या अध्यक्षतेखालील समितीसमोर ठेवावेत.

अर्जांची नोंद स्वतंत्र नोंदवहीत ठेवण्यात येऊन अर्जदारास पोच देण्यात यावी. स्थानिक स्वराज्य संस्था यांच्याकडे उपलब्ध मालमत्ता कराचे नोंदवही, अतिक्रमण सर्वेक्षण नोंदवही, झोपडपट्टी घोषणेची अधिसूचना, तसेच महावितरणकडे उपलब्ध दिनांक ०१.०१.२०११ रोजीची वीजबील विषयक माहिती, उपलब्ध असल्यास उपग्रह छायाचित्र असे वर नमूद केलेल्या इतर पुराव्यांच्या या आधारे सत्यतेची पडताळणी करण्यात यावी.

संबंधित महानगरपालिका, नगरपालिका/नगरपरिषद/नगरपंचायत,इतर स्थानिक नियोजन प्राधिकरण तसेच गटविकास अधिकारी यांनी या शासन निर्णयाच्या अंमलबजावणीकरीता आवश्यक ते मनुष्यबळ आणि अनुषंगिक बाबी तहसिलदार, उपविभागीय अधिकारी व जिल्हाधिकारी कार्यालय यांचे मागणी प्रमाणे उपलब्ध करुन देण्यात यावी. तसेच गावठाण क्षेत्रातील ज्या लाभार्थ्यांकडे जमीनीची मालकी नाही, अशा लाभार्थ्यांना मागील ३ वर्षाच्या मालमत्ता कर पावतीच्या आधारे पात्र ठरवण्यात यावे.

**३. स्वयंघोषणापत्र:-** अर्जदाराने स्वतःहून सादर केलेली माहिती व पुरावे सत्य असल्याबाबतचे शपथपत्र सादर करावे. तसेच संपूर्ण महाराष्ट्र राज्यात केवळ एकच अतिक्रमण नियमित करण्यात येणार असल्याने

अर्जदाराने तसे स्वयंघोषणापत्र अर्जासोबत सादर करणे बंधनकारक असेल. अर्जदाराने दिलेली माहिती व पुरावे असत्य असल्याचे केव्हाही आढळल्यास अर्जदारास या योजनेखाली अपात्र ठरविण्यात येईल आणि सदर जागेवरील अतिक्रमण नियमित न करता ते निष्कासित करण्यात येईल.

**४. मोजणी**:- भूमी अभिलेख विभागामार्फत संबंधित जागेची अधिकृत मोजणी करून सीमा निश्चित करण्यासाठी अतिक्रमण नियमानुकूल करताना या सर्व अतिक्रमण धारकांच्या घराची/भूखंडाची मोजणी करावी व त्यानंतर अतिक्रमण नियमानुकूल करण्याचा प्रस्ताव सक्षम प्राधिकारी यांनी मंजूर करावा. भूमी अभिलेख विभागाकडून जागेची विनाशुल्क मोजणी करणे अनिवार्य आहे.

**५. हरकती व सूचना**:- प्रस्तावित अतिक्रमण नियमानुकूल करणेबाबत स्थानिक क्षेत्रात कोतवाल/ तलाठी/ ग्रामपंचायत शिपायामार्फत/सर्व नागरी संस्था व त्यांचे स्थानिक कार्यालयामार्फत दवंडी देऊन १५ दिवसांच्या आत हरकती मागवणे.

**६. भोगवटादार वर्ग-२ म्हणून मान्यता**: -अतिक्रमण नियमित केलेली जमीन धारण करणारा पुरुष असल्यास आणि त्याची पत्नी हयात असल्यास सदर जमीन ही पती व पत्नी यांचे संयुक्त नावाने नियमानुकूल करण्यात येऊन नवीन शर्तीवर 'भोगवटादार वर्ग-२' (हस्तांतरण व विभाजन प्रतिबंधित) या भोगाधिकाराने दिली जाईल. अतिक्रमण नियमानुकूल करण्याचे आदेश निर्गमित केल्यावर अतिक्रमण धारकाकडून महराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट लावणे) नियम १९७१ मधील नमुना १४ मध्ये करारनामा करून घेण्यात यावा.

**७. सार्वजनिक उपयोगाच्या जमिनींबाबत निर्बंध**:-महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील कलम २२ नुसार निस्तार हक्कासाठी राखून ठेवलेल्या जमिनी, स्मशानभूमी, खेळण्याचे मैदान, आणि शाळा/रुग्णालयासाठी आरक्षित असलेल्या जमिनींवरील अतिक्रमणे तसेच, महाराष्ट्र क्षेत्र विकास व नगर रचना अधिनियम, १९६६ मधील तरतुदीनुसार इतर कोणत्याही सार्वजनिक प्रयोजनासाठी राखीव जागेवरील अतिक्रमणे कोणत्याही परिस्थितीत नियमित केली जाणार नाहीत. अशी अतिक्रमण नियमाकूल करावयाची असल्यास प्रथमत: त्या अतिक्रमित जागा कायदेशिर प्रक्रियेने रहिवाशी भागात समाविष्ठ करून घेणे वा संबंधित प्राधिकरणाने सदर जागेवर रहिवास प्रयोजनासाठी आरक्षण बदलून घेणे आवश्यक राहील.

**८. अतिक्रमण नियमानुकूल करण्याचे क्षेत्र**:- अतिक्रमण नियमानुकूल आदेश पारित करताना उप अधिक्षक भूमी अभिलेख / नगर भूमापन अधिकारी यांच्या मोजणीतील निश्चित केलेले क्षेत्र अंतिम क्षेत्र म्हणून गृहित धरून त्याप्रमाणे कब्जा हक्काची रक्कम निश्चित करण्यात यावी.

**९.अतिक्रमण नियमानुकूल करण्यास सक्षम प्राधिकारी**:-महानगरपालिका, "अ" वर्ग नगरपालिका क्षेत्रात क्षेत्रात जिल्हाधिकारी, "ब" व "क" वर्ग नगरपालिका/नगरपंचायत क्षेत्रात संबंधित उपविभागीय अधिकारी व ग्रामीण भागात संबंधित तहसीलदार यांना अतिक्रमण नियमानुकूल करणेबाबतचे अधिकार प्रदान करण्यात येत आहेत.

**१०. अपात्र ठरल्यास कारवाई**:- ज्या अर्जदारांचे अर्ज अपात्र ठरतील, त्यांच्यावर महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील कलम ५३ नुसार ३० दिवसांच्या आत अतिक्रमण काढून घेण्याची नोटीस बजावण्यात येईल. आदेशाचे पालन न झाल्यास सक्तीने निष्कासन (Eviction) करून त्याचा खर्च अतिक्रमणधारकाकडून वसूल केला जाईल.

**११. अपात्र अतिक्रमणे:-** नदीपात्र, नाले, सार्वजनिक रस्ते, वने (Forest Land), आणि धोकादायक क्षेत्रातील (Landslide prone), वेटलँड/सीआरझेड बाधित अतिक्रमणे नियमित केली जाणार नाहीत. न्यायालयीन वाद असलेल्या जमिनींबाबतचा निर्णय न्यायालयाच्या अंतिम निकालाच्या अधीन राहील.

**१२. अतिक्रमणमुक्त झालेल्या जागेचा उपयोग :-** वरीलप्रमाणे अतिक्रमणमुक्त झालेल्या जागेचा तात्पुरता ताबा तात्काळ स्थानिक स्वराज्य संस्थेकडे व्यवस्थापनाकरिता सुपूर्त करण्यात यावा. अशाप्रकारे तात्पुरता ताबा दिलेल्या संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था यांनी सदर जागेस कुंपण करुन त्या जागेचे संरक्षण करावे. त्या जागेचा उपयोग स्थानिक स्वराज्य संस्थाना त्या वस्तीतील/परिसरातील नागरिकांच्या सार्वजनिक सोयीसुविधांसाठी विहित कार्यपद्धतीनुसार सक्षम प्राधिकरणाच्या मान्यतेने करता येईल .

**१३.** महानगरपालिका/नगरपालिका क्षेत्रातील एखादी अतिक्रमीत वसाहत ही म्हाडा/झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांचेकडून नियमित करून त्यावर पक्के घरे तयार करून घेणार असतील, तर अशी वसाहत म्हाडा/झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांचेकडून विकसित करून घ्यावी. महसूल विभागाने असे अतिक्रमित क्षेत्र म्हाडा/झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण करीता प्रस्तावित करावे.

**१४.** अतिक्रमण धारक अर्जदाराने अतिक्रमण नियमानुकूल करण्यासाठी अर्ज केल्याच्या दिवसापासून ९० दिवसाच्या आत सक्षम प्राधिकारी यांनी अतिक्रमण नियमानुकूल करणे बाबत निर्णय घेणे बंधनकारक राहील.

**१५.** शासकीय जमिनीवरील अतिक्रमीत जागेवर बांधलेल्या घरात एकापेक्षा जास्त कुटूंब वास्तव्यास असतील तर असे अतिक्रमण नियमानुकूल केलेल्या जागेचा पट्टा हा सर्व संबंधित कुटूंब प्रमुखांच्या नावाने सामाईक नावाने देण्यात यावा.

**१६.** शासकीय जमिनीवरील अतिक्रमण नियमानुकूल केलेल्या जमिनीचे नोंदणीकृत दस्तऐवज करावयाचे झाल्यास १००० चौ.फुट क्षेत्रापर्यंतच्या नोंदणीसाठी रु.१०००/- व १५०० चौ. फुट क्षेत्रापर्यंतच्या नोंदणीसाठी रु. २०००/- इतके नोंदणी शुल्क आकारण्यात यावे.

**१७.** शासकीय जमिनीवरील अतिक्रमण नियमानुकूल केलेल्या जमिनीचे असे अतिक्रमण नियमानुकूल केल्यापासून पाच वर्षानंतर भोगवटादार वर्ग- १ मध्ये रुपांतरण करावयाचे झाल्यास अशा रुपांतरणासाठी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील तरतूदी लागू होतील.

**१८.** दि.०१.०१.२०११ पूर्वीचे शासकीय जमिनीवरील अतिक्रमण नियमानुकूल करणे हे अपरिहार्य असेल पण सदर जमिनीवर रहिवास प्रयोजनाव्यतिरिक्त कारणास्तव वापर अनुज्ञेय असेल तर नियोजन प्राधिकरण यांनी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलम २० व ३७ नुसार रहिवास वापरकरिताच्या झोन बदलाबाबतची कार्यवाही करावी.

**१९.** दि. ०१.०१.२०११ पूर्वीचे शासकीय जमिनीवरील अतिक्रमण नियमानुकूल करणे हे कोणत्याही परिस्थितीत शक्य नसल्यास उदा. (नदी, नाले च्या पूररेषेतील अतिक्रमणे, वन, सीआरझेड, एनडीझेड, रेल्वे मार्ग, महामार्ग, विद्युत वाहिन्या इ.) अशी अतिक्रमणे नियमानुकूल करण्यात येऊ नये. तथापि, अशी कुटूंबे निवाऱ्यापासून वंचित होऊ नये यासाठी संबंधित सक्षम प्राधिकारी यांनी अशा सर्व पात्र कुटूंबांची गावनिहाय यादी करुन त्यांना प्रधानमंत्री आवास योजनेतून घरे उपलब्ध करुन देण्यात यावी अथवा ग्रामीण भागामध्ये महसूल मंडळ स्तरावर गावनिहाय पात्र कुटूंबाची यादी तयार करुन शक्य तो मोठ्या महसूल गावाच्या जवळील शासकीय जमिनीवर भूखंड उपलब्ध करुन सदर कुटूंबाना १००० चौ. फुट क्षेत्राचे भूखंड देऊन वसविण्यात यावे.

**२०.** नागरी भागात (मनपा / नगरपरिषद / नगरपंचायत) प्रभागनिहाय पात्र कुटूंबांच्या याद्या तयार करुन त्यांना प्रधानमंत्री आवास योजनेतून घरे उपलब्ध करुन देण्यात यावी. शक्य असल्यास, नागरी क्षेत्रासाठी सोलापूर येथील रे नगर वसाहतीच्या धर्तीवर नवीन वसाहत तयार करण्यात यावी.

## २.५) अंमलबजावणी यंत्रणा:-

सर्व प्रकारची अतिक्रमणे नियमानुकूल करण्याबाबत महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील कलम ५०, ५१, ५२ आणि ५३ तसेच महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनींची विल्हेवाट करणे) नियम, १९७१ मधील नियम ४३ व ५१ अन्वये शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे नियमानुकूल करण्यासाठी शिफारस करण्याचे अधिकार खालील नमूद समित्यांना प्रदान करण्यात येत आहे. संबंधित समित्यांनी प्राप्त अर्जांची छाननी करून पात्र/अपात्रतेचा निर्णय घ्यावा. **या धोरणाखाली अतिक्रमण नियमानुकूल करण्यासाठी खालील नमूद समित्या सक्षम असतील, त्यास वेगळयाने शासन मान्यतेची आवश्यकता असणार नाही.**

१) महानगरपालिका, स्थानिक नियोजन प्राधिकरण व 'अ' वर्ग नगरपरिषदांच्या हद्दीतील शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे नियमित करण्यासाठी समिती:-

| अ.क्र. | पदनाम | समितीमधील पद |
|---|---|---|
| १ | जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २ | आयुक्त, महानगरपालिका | सदस्य |
| ३ | उपवन संरक्षक (सर्व) | सदस्य |
| ४ | जिल्हा अधिक्षक, भूमी अभिलेख | सदस्य |
| ५ | महानगरपालिका/नगरपरिषदेतील नगर रचना विभागाचे संबंधित अधिकारी/सहायक संचालक, नगर रचना | सदस्य |
| ६ | जिल्हाधिकारी यांनी नियुक्त केलेला उप जिल्हाधिकारी (महसूल/सामान्य) | सदस्य |
| ७ | कार्यकारी अभियंता, महावितरण (सर्व) | सदस्य |
| ८ | संबंधित उप विभागीय अधिकारी | सदस्य |
| ९ | संबंधित तहसीलदार/अपर तहसीलदार | सदस्य |
| १० | संबंधित नगरपरिषद मुख्याधिकारी ('अ' वर्ग नगरपरिषदाकरीता) | सदस्य |
| ११ | सर्व स्थानिक नियोजन प्राधिकरणाचे प्रतिनिधी (एमएमआरडीए, पीएमआरडीए, सिडको इ. नागरी प्राधिकरणे) | सदस्य |
| १२ | संबंधित महानगरपालिका आयुक्त त्यांनी नामनिर्देशीत केलेला अपर आयुक्त/ उपायुक्त/ संबंधित 'अ' वर्ग नगरपरिषद मुख्याधिकारी | सदस्य सचिव |

समिती अध्यक्ष हे या शासन निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक असल्यास संबंधित इतर विभागाच्या अधिका-यांना निमंत्रित करु शकतील.

२) 'ब' व 'क' वर्ग नगरपरिषदा व नगरपंचायत हद्दीतील शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे नियमित करण्यासाठी समिती:-

| अ.क्र. | पदनाम | समितीमधील पद |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| १ | संबंधित उप विभागीय अधिकारी | अध्यक्ष |
| २ | उप अधिक्षक, भूमी अभिलेख | सदस्य |
| ३ | सहायक संचालक नगररचना/ नगर रचनाकार यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ४ | संबंधित तहसीलदार/अपर तहसीलदार | सदस्य |
| ५ | संबंधित वनपरिक्षेत्र अधिकारी | सदस्य |
| ६ | सहायक/उप अभियंता, महावितरण (सर्व) | सदस्य |
| ७ | सर्व स्थानिक नियोजन प्राधिकरणाचे प्रतिनिधी (एमएमआरडीए, पीएमआरडीए, सिडको इ. नागरी प्राधिकरणे) | सदस्य |
| ८ | संबंधित नगरपरिषद/नगरपंचायत मुख्याधिकारी | सदस्य सचिव |

समिती अध्यक्ष हे या शासन निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक असल्यास संबंधित इतर विभागाच्या अधिका-यांना निमंत्रित करु शकतील.

३) ग्रामीण भागातील शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे नियमित करण्यासाठी समिती:-

| **अ.क्र.** | **पदनाम** | **समितीमधील पद** |
|---|---|---|
| १ | संबंधित तहसीलदार | अध्यक्ष |
| २ | उप अधिक्षक, भूमी अभिलेख | सदस्य |
| ३ | सहायक संचालक नगररचना/ नगर रचनाकार यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ४ | संबंधित वनपरिक्षेत्र अधिकारी | सदस्य |
| ५ | सहायक/उप अभियंता, महावितरण (सर्व) | सदस्य |
| ६ | ग्राम महसूल अधिकारी | सदस्य |
| ७ | सर्व स्थानिक नियोजन प्राधिकरणाचे प्रतिनिधी (एमएमआरडीए, पीएमआरडीए, सिडको इ. नागरी प्राधिकरणे) | सदस्य |
| ८ | संबंधित ग्रामपंचायत (ग्राम विकास अधिकारी/ग्रामसेवक) | सदस्य |
| ९ | गट विकास अधिकारी | सदस्य सचिव |

समिती अध्यक्ष हे या शासन निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक असल्यास संबंधित इतर विभागाच्या अधिका-यांना निमंत्रित करु शकतील.

४) आढावा समिती:-

अ) जिल्हास्तरीय आढावा समिती:- संबंधित जिल्ह्याचे पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली खालील नमूद सदस्यांची आढावा समिती गठीत करण्यात यावी. सदर समितीने सदर धोरणाचा दर ३ महिन्यांनी आढावा घेणे आवश्यक आहे.

| **अ.क्र.** | **पदनाम** | **समितीमधील पद** |
|---|---|---|
| १ | मा.पालकमंत्री | अध्यक्ष |
| २ | जिल्ह्यातील इतर मंत्री व राज्यमंत्री | सह अध्यक्ष |
| ३ | विधान परिषद सदस्य | सदस्य |
| ४ | जिल्हाधिकारी | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ५ | आयुक्त, महानगरपालिका | सदस्य |
| ६ | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | सदस्य |
| ७ | सर्व स्थानिक नियोजन प्राधिकरणाचे प्रतिनिधी (एमएमआरडीए, पीएमआरडीए, सिडको इ. नागरी प्राधिकरणे) | सदस्य |
| ८ | उपवन संरक्षक (सर्व) | सदस्य |
| ९ | प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा | सदस्य |
| १० | अधिक्षक अभियंता, महावितरण | सदस्य |
| ११ | जिल्हा नियोजन अधिकारी | सदस्य |
| १२ | जिल्हा सह आयुक्त, नगरपालिका प्रशासन, जिल्हाधिकारी कार्यालय | सदस्य |
| १३ | जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख | सदस्य |
| १४ | प्रकल्प अधिकारी(सर्व),एकात्मिक आदिवासी विकास विभाग | सदस्य |
| १५ | जिल्हा सह निबंधक (मुद्रांक) | सदस्य |
| १६ | सहायक आयुक्त, समाजकल्याण | सदस्य |
| १७ | निवासी उप जिल्हाधिकारी | सदस्य सचिव |

ब) विधानसभा क्षेत्रस्तरीय आढावा समिती:- संबंधित विद्यमान विधानसभा सदस्य यांच्या अध्यक्षतेखाली खालील नमूद सदस्यांची संबंधित विधानसभा क्षेत्रस्तरीय आढावा समिती गठीत करण्यात यावी. सदर समिती सदर धोरणाचा दर ३ महिन्यांनी आढावा घेणे आवश्यक आहे.

| **अ.क्र.** | **पदनाम** | **समितीमधील पद** |
|---|---|---|
| १ | विद्यमान विधानसभा सदस्य | अध्यक्ष |
| २ | मा. मंत्री महसूल यांनी नामनिर्देशित केलेली व्यक्ती | सह अध्यक्ष |
| ३ | तहसीलदार (सर्व) | सदस्य |
| ४ | गट विकास अधिकारी (सर्व) | सदस्य |
| ५ | उप- अधिक्षक भूमी अभिलेख (सर्व) | सदस्य |
| ६ | नगरपालिका / नगरपंचायत क्षेत्रातील मुख्याधिकारी (सर्व) | सदस्य |
| ७ | महानगरपालिका क्षेत्रातील संबंधित सहायक आयुक्त | सदस्य |
| ८ | सहायक/उप अभियंता, महावितरण (सर्व) | सदस्य |
| ९ | सर्व स्थानिक नियोजन प्राधिकरणाचे प्रतिनिधी (एमएमआरडीए, पीएमआरडीए, सिडको इ. नागरी प्राधिकरणे) | सदस्य |
| १० | संबंधित उपविभागीय अधिकारी (विधानसभा मतदार संघातील सर्वात जास्त क्षेत्र असलेले) | सदस्य सचिव |

**०३.** सदर शासन निर्णय विधी व न्याय विभाग, ग्राम विकास विभाग, गृह निर्माण विभाग, नगर विकास विभाग यांच्याशी विचारविनिमय करुन व वित्त विभागाच्या सहमतीने व त्याचेकडील अनौपचारीक संदर्भ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

**०४.** सदर शासन निर्णय, शासनाच्या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक सांकेतांक क्र. असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(संजय धारुरकर )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत:-**

१) मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२) मा.मुख्यमंत्री महोदय यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. उप मुख्यमंत्री, नगर विकास यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
४) मा. उप मुख्यमंत्री, क्रिडा व राज्य उत्पादन शुल्क यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६) मा.राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
७) मा.विरोधी पक्ष नेता, विधान सभा/ विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
८) सर्व लोकसभा, राज्यसभा, विधानसभा व विधान परिषद सदस्य
९) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
१०) अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे स्वीय सहायक,महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
११) अपर मुख्य सचिव (वित्त) यांचे स्वीय सहायक, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१२) अपर मुख्य सचिव (नवि- १) यांचे स्वीय सहायक,नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१३) प्रधान सचिव (नवि- २) यांचे स्वीय सहायक,नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१४) प्रधान सचिव (ग्रामविकास) यांचे स्वीय सहायक,ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१५) प्रधान सचिव, विधान मंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई
१६) सर्व विभागीय आयुक्त/उपायुक्त (महसूल) विभागीय आयुक्तांचे कार्यालय
१७) सर्व महानगर पालिका आयुक्त
१८) महालेखापरिक्षक (लेखा परिक्षा/लेखा अनुज्ञेयता), नागपूर/मुंबई
१९) जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२०) सर्व जिल्हाधिकारी/अपर जिल्हाधिकारी/निवासी उपजिल्हाधिकारी.
२१) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
२२) सर्व मुख्याधिकारी, नगरपालिका
२३) उप सचिव (ज-१) यांचे स्वीय सहायक, महसूल व वन विभाग, मुंबई
२४) सर्व सह सचिव/उप सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
२५) कक्ष अधिकारी (ल-१), महसूल व वन विभाग, मंत्राल य, मुंबई
२६) "ज" समूहातील सर्व अवर सचिव/कार्यासन अधिकारी, महसूल व वन विभाग,मंत्रालय, मुंबई
२७) निवडनस्ती (जमीन-०१)